**शिशुवर्ग ते बारावीपर्यात शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व कालबद्ध करण्यासाठी MahaDBT Portal वर महाआयटीद्वारे विकसित "महाशिष्यवृत्ती" एकात्मिक संगणकीय प्रणालीचा अवलंब करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## दिव्यांग सक्षमीकरण विभाग

**शासन निर्णय, क्रमांक : योजना-२०२६ /प्र.क्र. १०६/ E Office No. १६७४४७४ / कार्यासन-२**

३१,३२,३५ ए, तिसरा मजला, ए-विंग, मित्तल टॉवर,
बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दिनांक :- २५ मे, २०२६

वाचा:-

१) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.संकिर्ण २०२६/प्र.क्र.०६/समन्वय-२, दिनांक ८ जानेवारी, २०२६ रोजीचे पत्र,

२) इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे महाआयटीस पाठविलेले पत्र क्र.शिवृत्ती-२०२५ / प्र. क्र. ६४ / शिक्षण-१, दिनांक २१ जानेवारी, २०२६,

३) दिव्यांग सक्षमीकरण विभाग, शासन निर्णय क्रमांक : योजना-२०२५ /प्र.क्र. १५४/ E Office No. १३७३६१३ / कार्यासन-२, दिनांक ७ मे, २०२६.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमार्फत मॅट्रिकपूर्व (Pre-Matric) शिष्यवृत्ती योजना MahaDBT प्रणालीद्वारे राबविण्यात येतात. सद्यस्थितीत शिष्यवृत्ती योजनांच्या अंमलबजावणीची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व विद्यार्थीकेंद्रित होण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविल्या जाणाऱ्या मॅट्रिकपूर्व (Pre-Matric) शिष्यवृत्ती योजनांचे मा. मुख्यमंत्री कार्यालयाच्या निर्देशानुसार सर्व संबंधित विभागांतर्गत अभ्यासगटामार्फत Governance Process Re-Engineering करण्यात आले आहे.

सदर Governance Process Re-Engineering अहवाल सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ८ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये इतर मागास बहुजन कल्याण विभागास प्राप्त झाला होता. सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार सदर GPR अहवाल आवश्यक प्रणाली विकास व अंमलबजावणीची कार्यवाही करण्याकरीता व्यवस्थापकीय संचालक, महाआयटी यांना इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत दिनांक २१ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आला होता. त्यानुषंगाने महाआयटीद्वारे विकसित **"महाशिष्यवृत्ती"** एकात्मिक संगणकीय प्रणालीचा अवलंब करण्याची बाब या विभागाच्या विचाराधीन होती. त्यानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

**<u>शासन निर्णय</u> :**

दिव्यांग सक्षमीकरण विभागाची शिशुवर्ग ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून **"महाशिष्यवृत्ती"** या एकात्मिक संगणकीय प्रणालीद्वारे MahaDBT 2.0 पोर्टलवर राबविण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने या विभागाद्वारे राबविण्यात येणारी व अंमलबजावणी करण्यात येणारी सदर योजना MahaDBT 2.0 पोर्टलवरील **"महाशिष्यवृत्ती"** एकात्मिक संगणकीय प्रणाली याद्वारे लागू करण्यात येत आहे.

२. **"महाशिष्यवृत्ती"** एकात्मिक संगणकीय प्रणालीमुळे या विभागाची शिशुवर्ग ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना एकाच डिजिटल पोर्टलवर (Digital Portal) एकत्रित उपलब्ध होऊन योजनेची अंमलबजावणीची प्रक्रिया विद्यार्थ्यांसाठी सुलभ व सुसंगत होईल.

३. पोर्टलवर संबंधित संस्थेमार्फत विद्यार्थ्यांचे नमूद केलेल्या माहितीच्या आधारे ते ज्या योजनांसाठी संभाव्यतः पात्र असू शकतात अशा योजनांची माहिती पाहण्याची सुविधा त्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना योजनांसाठी अर्ज करताना माहितीपूर्ण व पारदर्शक पद्धतीने निर्णय घेणे सुलभ होईल. यामुळे अपात्र अर्जांचे प्रमाण कमी होण्यास मदत होऊन संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया अधिक कार्यक्षम, पारदर्शक व विद्यार्थी-केंद्रित होईल.

४. विद्यमान ऑनलाईन प्रणालीमधील ६४ पेक्षा अधिक अर्ज माहिती क्षेत्रांचे (Application Fields) योजनानिहाय भरावे लागतात. या प्रणालीमुळे सदर Fields ची संख्या कमी करुन ती ३१ क्षेत्रांपर्यंत मर्यादीत करण्यात आली आहे.

५. तसेच विद्यार्थ्यांना सादर करावी लागणारी कागदपत्रांची संख्या कमी करण्यात आल्याने त्यांना पुनरावृत्ती स्वरूपातील माहिती भरणे व कागदपत्रे सादर करणे टाळण्यासाठी आधार, UDISEl ई. शासकीय डेटाबेसमधून माहिती व कागदपत्रांचे Auto-Fetch लागू करण्यात येत आहे.

६. तसेच विद्यमान तीन-स्तरीय छाननी यंत्रणा सुलभ करून सरासरी दोन छाननी स्तरांपर्यंत मर्यादित करण्यात येत असून, त्यामुळे अर्जांची छाननी व मंजूरी प्रक्रीया जलदगतीने करणे शक्य होणार आहे.

७. शिशुवर्ग ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती नूतनीकरण प्रक्रियादेखील Pre-filled Renewal Application द्वारे सुलभ करण्यात येत असून, विद्यार्थ्यांना केवळ शुल्क भरण्याचा तपशील व इतर बदल झालेली माहिती अद्ययावत करावी लागेल.

८. तसेच उत्पन्नाधारित योजनांसाठी प्रथम वर्षी सादर करण्यात आलेले उत्पन्न प्रमाणपत्र स्वयंघोषणापत्राच्या (Self Declaration) आधारे संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीसाठी वैध राहील.

९. अर्जदार / लाभार्थ्यास संबंधीत संस्थेच्या मार्फत त्याच्या अर्जाची स्थिती (Status) वेळोवेळी ऑनलाइन पाहता येईल अथवा तपासता येईल.

१०. या शिष्यवृत्तीच्या रकमेचे वितरण (Disbursement) लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यावर थेट ऑनलाईन पद्धतीने जमा करण्यात येईल.

११. सदर शासन निर्णयाद्वारे **"महाशिष्यवृत्ती"** ही एकात्मिक संगणकीय प्रणाली MahaDBT 2.0 पोर्टलवर लागू करण्यात येत असली, तरीही शिशुवर्ग ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजनांच्या मूळ शासन निर्णयांद्वारे निर्धारीत करण्यात आलेल्या अटी, शर्ती, पात्रता निकष, आर्थिक मर्यादा, लाभांचे स्वरूप व अंमलबजावणीची मूलभूत तत्त्वे कायम राहतील.

१२. प्रस्तुत प्रणाली ही अर्ज भरणे, अर्ज तपासणे (Scrutiny), शिष्यवृत्ती मंजुरी, शिष्यवृत्तीच्या रकमेचे हस्तांतरण व अर्जाचे नूतनीकरण प्रक्रिया इ. बाबी सुलभ, पारदर्शक व कालबद्ध करण्यासाठी तांत्रिक व प्रशासकीय सुधारणा म्हणून लागू करण्यात येत आहे.

१३. शिशुवर्ग ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजनेच्या शासन निर्णयांमध्ये वेळोवेळी करण्यात आलेले सुधारित बदल, शुद्धीपत्रके, परिपत्रके व पूरक सूचना यानुसार "महाशिष्यवृत्ती" संगणकीय प्रणालीत महाआयटीने वेळोवेळी बदल करणे आवश्यक राहील.

१४. सदर महाशिष्यवृत्ती प्रणालीमार्फत विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची कार्यपद्धती www. mahadbt2.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील युजर मॅन्युअलमध्ये सविस्तरपणे देण्यात आलेली आहे. तसेच विविध योजनांचे निकष, पात्रता व शिष्यवृत्ती लाभाचा तपशील देखील याच संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

१५. या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट "अ"** मध्ये शिष्यवृत्ती योजनेच्या अर्जाचा नमुना जोडला आहे.

१६. उपरोक्त सर्व सुधारणा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अंमलात येतील. त्यानुषंगाने या विभागाच्या नियंत्रणाखालील आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याची दक्षता घ्यावी.

१७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०५२५१८१८२५७१३५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VISHNUDAS
PUNDLIKRAO
GHODKE

Digitally signed by VISHNUDAS PUNDLIKRAO GHODKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PERSONS WITH DISABILITIES WELFARE DEPARTMENT, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9AB69D6945F8950A9525831F8AE9726BE295D17576E78D19FA8F6CB952BB04A0, cn=VISHNUDAS PUNDLIKRAO GHODKE
Date: 2026.05.25 18:19:46 +05'30'

**( वि. पुं. घोडके)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सोबत : परिशिष्ट – "अ"**

**प्रति**

1) मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
2) मा. मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
3) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास विभाग) महोदयांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
4) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) महोदयांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
5) मा. मंत्री, दिव्यांग सक्षमीकरण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

6) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
7) सचिव, दिव्यांग सक्षमीकरण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
8) अपर मुख्य सचिव नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
9) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
10)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
11)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
12)संचालक लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
13)आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण आयुक्तालय, पुणे.
14) दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या नियंत्रणाखालील प्रादेशिक स्तरावरील सर्व अधिकारी,
15)दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या नियंत्रणाखालील जिल्हा स्तरावरील सर्व अधिकारी,
16)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
17)निवासी लेखापरिक्षक अधिकारी, मुंबई.
18)जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
19)विभागातील सर्व उप सचिव/अवर सचिव / कक्ष अधिकारी, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
20)कार्यासन (व्यय-१४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
21)निवड नस्ती  कार्यासन-२

परिशिष्ट – “अ”

<u>योजनेच्या अर्जाचा नमुना</u>

योजनेचे नांव : शिशुवर्ग ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना.
विभागाचे नांव : दिव्यांग सक्षमीकरण विभाग.

**Applicant Personal Details**

| | |
|---|---|
| Aadhaar Number * | Aadhaar Bank Link Status * |
| Enter aadhaar number [Verify] | Select |
| Applicant Name (as per Aadhaar) * | Date of Birth * |
| Enter applicant name (as per aadhaar) | dd-mm-yyyy |
| Age * | Address |
| Enter age | Enter address |
| State | District |
| Select | Select |
| Taluka | Village |
| Select | Select |
| Pincode | Parent Aadhaar |
| Enter pincode | Enter parent aadhaar |
| Child Number in Family | Mobile No. of Parent |
| Select | Enter mobile no. of parent |
| PEN ID | Gender * |
| Enter pen id [Fetch] | Select |
| Religion * | Caste Category * |
| Select | Select |
| Caste | |
| Select | |

## Parent Details

Father Name *

Enter father name

Mother Name *

Enter mother name

Is your father or mother engaged in unclean or hazardous occupations? *

Select

## School Details

School UDISE Code *

27220100109

Standard/Grade *

Select

Previous Year Attendance (%) *

Enter previous year attendance (%)

Previous Year Rank in Classroom *

Enter previous year rank in classroom

Previous Year Percentage (%) *

Enter previous year percentage (%)

Previous Year Grade *

Enter previous year grade

## Hostel Details

Are you a Hosteller? *

Yes

Hostel Type *

Select

Hostel State *

Select

Hostel District *

Select

Hostel Taluka *

Select

## Personal and Income Details

Residence / Domicile Certificate *

Choose File No file chosen Upload

Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

Caste Certificate *

Choose File No file chosen Upload

Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

## Family Income and Occupation Details

Family Income Certificate

Choose File No file chosen Upload

Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

Ration Card

Choose File No file chosen Upload

Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

Parent's Hazardous Occupation Certificate

Choose File No file chosen Upload

Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

## Declaration

- I confirm that my Aadhaar seeded account is NOT a 'Jan Dhan' account and no credit limit is applicable on the account.
- I confirm that my Aadhaar seeded bank account is active.
- I confirm that my family has not availed benefits under any Government scholarship/ hostel scheme(s) for more than 2 children.
- I confirm that I have applied for and availed the scholarship benefit from the Government for not more than 1 scholarship/ freeship scheme and 1 accommodation scheme (as applicable).
- I hereby declare that, where family income is an eligibility criteria for the scholarship, I shall be solely responsible for promptly informing the concerned Institute of study and the respective Department in writing if my family income exceeds the prescribed threshold of INR 2.5 lakh or INR 8 lakh, as applicable, at the time of renewal of scholarship. I understand that failure to disclose such changes may render me ineligible for the scholarship and may attract recovery of benefits and any other action as per applicable rules.

☐ I have read and agree to this declaration.